काही विद्वानांच्या मते अशा या भक्तीचा उदय ख्रिस्ती धर्मात झाला आहे. तर काहींच्या मते भारतीय संप्रदायावर इस्लामचा प्रभाव असल्याचे दिसते. तर काही विद्वानांच्या मते भक्तीचा उगम हा भारतीय भूमीमध्येच प्रथम झाला. त्याच बरोबर वेदसंहिते मधील भक्ती संकल्पनेबाबत ही विद्वानांमध्ये मतभेद आहेत. काहींच्या मते भक्ती हा शब्द प्रथम श्वेताश्वर उपनिषदात आढळतो. तर काही विद्वानांच्या मते भक्ती ही मूळची वैदिक परंपरेतून आलेली नसून ती अवैदिक आहे . अशा प्रकारे भक्ति संकल्पने बाबत विविध मतभेद असले तरी खऱ्या अर्थाने या भक्तीचा उगम दक्षिणेत झाला . तामिळनाडूतील आळवार नावाच्या वैष्णव संतांनी भारतामधील भक्ती पंथाचा प्रारंभ केला आणि त्यानंतर या पंथाचा भारतभर प्रसार झाला. आळवारांचा ' प्रबंधम् ' नावाचा ग्रंथ हा भक्ती पंथाचा मूल स्तोत्र आहे असे ते मानता. अशा या भक्ती या संकलपनेचा शोध घेताना आपण मध्ययुगामध्ये येऊन पोहोचतो. सामान्यता मध्ययुग हे साधना पद्धतीचे सुवर्ण युग म्हणून ओळखले जात होते . या युगामध्ये विविध साधना पद्धतींचा उदय व विकास झाला. तसेच अनेक विचार प्रवाह निर्माण झाले. त्याच युगामध्ये गोरक्षनाथ हे नाथ संप्रदायातील महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्व उदयास आले.

गोरक्षनाथांनी या कार्यकालात भारतभर ब्रह्मण करून आचरणाचे , विषय लोलुपतेचे, दांभिकतेचे परमार्थाच्या नावावर चालणाऱ्या दुराचारास आळा घालण्याचे महत्म असे कार्य केले . त्या ठिकाणी त्यांनी शुद्ध अशा योगसाधनेचे राज्य प्रस्थापित केले. जनसामान्य लोकांच्या अत्यंत तळमळीतून त्यांनी तत्त्वनिरोपणासाठी लोक भाषेचा स्वीकार केला.त्यांचा लोकोत्तर पुढे भारतीय साधने मध्ये भक्ती प्रधान परंपरा निर्माण करण्यात झाला. त्यामुळेच गोरक्षनाथांचा नाथ संप्रदाय हा जरी योग संप्रदाय असला तरी भक्ती आंदोलनाची गंगोत्री ठरला. तसेच ज्ञानेश्वरांनी 'अमृतानुभव ' या ग्रंथातून अध्यात्म विद्येचा जो ठेवा पुढील पिढींना दिला तो नाथ संप्रदायाने आपणास दिला. तो ठेवा अद्वयानंदवैभवाचा वारसा आहे असे संत ज्ञानेश्वर म्हणतात. तो पुढील ओवी वरून स्पष्ट होताना आपणास दिसून येतो.

तेणे योगाब्जिनिसरोवरू । विषय विध्वंसैकवीरु ।
तिये पदी का सर्वेश्वरु । अभिषेकला ॥
तेहि ते शांभव । अद्वयानंदवैभव ।
संपादिले सप्रभव । श्रीगयनीनाथी ॥

या ज्ञानेश्वरीतील ओवी वरून असे दिसून येते की, भक्तीचे मूळ स्थान हे नाथ संप्रदाय हेच आहे . याच भक्तीच्या प्रभावाने पुढे संत निवृत्तीनाथ ,संत ज्ञानेश्वर, संत कबीर ,संत गुरुनानक इत्यादी संतांना प्रभावित केले. त्याचबरोबर **महाराष्ट्रातील गहिनीनाथ कृष्ण भक्ती**च्या परंपरेचे कार्य महत्त्वपूर्ण मानावे लागेल . कारण महाराष्ट्र मध्ये नाथ संप्रदायाची परंपरा गहिनीनाथांनी रुजवली. त्यांनी

ब्रह्मगिरी ( त्र्यंबकेश्वर ) या ठिकाणी निवृत्तीनाथांना अनुग्रह दिला निवृत्तीनाथांनी ज्ञानेश्वरांना अनुग्रह दिला आणि अशाप्रकारे नाथ संप्रदायाचा वारसा वारकरी संप्रदायांमध्ये आला  या वारकरी संप्रदायामध्ये भक्तीला सर्वश्रेष्ठ असे स्थान दिले आहे .कारण भक्ती या साधनेच्या माध्यमातून समाजातील सर्वसामान्य लोकांना ईश्वराकडे घेऊन जाणारे हे सर्वसाधारण साधन आहे

निवृत्ती, गयनी कृपा जपतो अनुपम जाण ।
सांगितली खूण गोरक्षाने॥

या ओवीच्या माध्यमातून निवृत्तीनाथांनी गोरक्षनाथ आणि गहिनीनाथ याविषयी आपला आदरभाव व्यक्त केला आहे.कारण गहिनीनाथांनी महाराष्ट्रातील नाथपरंपरेस कृष्ण भक्तीची जोड दिली. त्यामुळेच नाथ संप्रदाय भक्ती संप्रदाय म्हणून ओळखला जाऊ लागला. तसेच गहिनीनाथांनी ‘  गोरक्ष गीता ’ हा ग्रंथ लिहिला या ग्रंथामध्ये त्यांनी योगा पेक्षा कृष्ण भक्तीवर आधिक भर दिल्याचे दिसते . यावरूनही नाथ संप्रदायातील भक्तीचे अस्तित्व सिद्ध होताना दिसून येते.

**संदर्भ :-**

➢ भिंगारकर कृ. ज्ञा. नाथ संप्रदाय आणि ज्ञानेश्वर , पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९ मार्च २००७ .

➢ वाडकर स.धो . नाथ संप्रदायाची परंपरा : लोकसाहित्य चिन्मय प्रकाशन औरंगाबाद २६ जानेवारी, २०१३ .

➢ मराठी विश्वकोश , प्रथम आवृत्ती .

**Cite This Article:**

** सुखदेव निवृत्ती लोखंडे, (2022)* गोरक्षनाथांची भक्ती संकल्पना, ***Electronic International Interdisciplinary Research Journal,*** *Volume No. XI (Special Issue-II), 185-188.*